Historicity Research Journal
Volume 2 | Issue 9 | May 2016

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

कोरियन विवादामध्ये भारताची भूमिका

गणेश देविदास शिंदे
संशोधक, (एम. ए., नेट, सेट)

प्रस्तावना :

भारताने स्वातंत्र्यपूर्व काळापासून जागतिक शांतता आणि अहिंसा या विचाराचा पुरस्कार केला. याचेच प्रतिबिंब स्वातंत्र्योत्तर काळात भारताच्या परराष्ट्रीय धोरणावर दिसून येते. भारताने स्वातंत्र्यापूर्वीच वसाहतवादी धोरणाचा विरोध केला. आणि स्वत:ला प्रथम, दुसऱ्या महायुद्धापासून दूर ठेवले. १९४५ नंतर उद्भवलेल्या शितयुद्धापासून अलिप्त राहून स्वत: विकासावर लक्ष्य केंद्रित केले. मात्र आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वतंत्रता व शांतता स्थापीत व्हावी ही भारतीय परराष्ट्रीय धोरणाचे प्रमुख ध्येय होते. स्वातंत्र्यापूर्वीपासून भारत वसाहतीच्या शोषणाचा बळी असल्याने भारताला जगामध्ये वसाहतवाद कोणत्याही स्वरुपात मान्य नव्हता. दुसऱ्या महायुद्धानंतर नव स्वतंत्र देशांनी संरक्षणावर अधिक खर्च केल्याने शर्धीधं स्पर्धेला चालना मिळाल्याने जागतिक शांतता राखणे आवश्यक होते. म्हणून भारताने जागतिक शांतता स्थापीत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय विवादामध्ये भूमिका निभावली.[१]

दुसऱ्या महायुद्धाच्या अस्तानंतर जगात अमेरिका आणि सोवियत संघ अशी दोन महासत्ता केंद्राचा उदय झाला. या दोन महासत्तामध्ये छुप्या युद्धाला पर्यायी स्पर्धेला सुरुवात झाली. यालाच शितयुद्ध म्हणून ओळखतात. या दोन महासत्तामधील शितयुद्धाचे आक्रमक स्वरुप म्हणजे ''कोरियन युद्ध'' होय. १९४८ मध्ये कोरियन भुभागाचे दोन भागात विभाजन उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियात झाले. अमेरिका आणि सोवियत संघाने अनुक्रमे लोकशाही दक्षिण कोरिया आणि साम्राज्यवाद- उत्तर कोरियात स्थापीत करण्यासाठी प्रोत्साहित केले. परिणामत: १९५० मध्ये कोरियन युद्धाला चालना मिळाली.[२]

प्रस्तुत विषयामध्ये राष्ट्रवादी (Nationalist) पद्धतीने इतिहास लेखन करण्यात आले आहे. यामध्ये ब्रिटिशांच्या वसाहतवादी इतिहास लेखनाच्या विरोधात भारतीयांनी राष्ट्रवादी इतिहास लेखनाला सुरुवात केली. राष्ट्रवादी इतिहास लेखनात भारताच्या गौरवशाली इतिहास लेखन करण्यात आले.

कोरिया विवाद :

दुसऱ्या महायुद्धापर्यंत कोरिया भूभाग जपानच्या अधिपत्याखाली होता. मात्र जापानच्या पराभवाने कोरिया भूभागावर सोवियत संघ आणि अमेरिकेने आपआपले वर्चस्व निर्माण करण्यास सुरुवात केली. तसेच १९४५ नंतर चीन मध्ये माओवादी आणि लोकशाही समर्थक यांच्यातील मतभेदात सोवियत संघ व अमेरिकेचा समावेश होता. त्यामुळे कोरियन विवादाला आगळेवेगळे महत्त्व प्राप्त झाले. परिणामत:१९४५ च्या कराराने १९४८ मध्ये कोरियन भूभागाचे उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियामध्ये विभाजन झाले.

१. उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरियामध्ये अनुक्रमे सोवियत संघ अमेरिका समर्थक सरकारची स्थापना झाली. मात्र या नवस्थापीत सरकारांना कोरियन भुभागाचे विभाजन स्वत:च्या सरकार अंतर्गत हवे होते. या एकछत्री करणासाठी २५ जुन १९५० मध्ये साम्यवादी उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण करुन कोरियन युद्धाला सुरुवात केली.[३]

२. १९५० मध्ये सुरु झालेले कोरियन युद्धाला संयुक्त राष्ट्र संघाने अमेरिका, सोवियत संघ, चीनच्या मदतीने युद्ध थांवबण्याचा प्रयत्न केला. परिणामत: सोवियत संघाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याने १० जुलै १९५३ मध्ये उत्तर कोरिया व दक्षिण कोरिया

दरम्यान शांतता वार्ता सुरु झाली. कोरियन युद्धाच्या समाप्तीनंतर ''युद्ध कैदीचा'' गंभीर प्रश्न उद्भवला. २७ जुलै १९५३ मे अरमिस्टिक कराराने (Armistice Agreement) दोन्ही देशांनी शांतता वार्तावर हस्ताक्षर केले.[४]

कोरियन विवादामध्ये भारताची भूमिका:

भारताने स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४७-१९५४ या काळात कोरियन विवादामध्ये रस दाखवला. भारत आणि कोरियामध्ये कोरियन भुभाग आणि जागतिक प्रश्नाबाबत मतभेद होते. सप्टेंबर १९४७-डिसेंबर १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघात भारत कोरियाच्या विरोधात आपल्या मताचा उपयोग करेल. मात्र भारताने कोरियन प्रश्न संयुक्त राष्ट्रवादाच्या मंचापर चर्चेसाठी उपस्थितीत करण्याविषयी मत मांडले.[५]

१. १९४८ मध्ये भारताच्या नेतृत्त्वात युनायटेड नेशन्स कमीशन ऑन कोरिया (United Nation Temporary Commission on Korea) UNTOCK ची स्थापना करण्यात आली. कमीशनचे नेतृत्त्व भारतातर्फे व्ही. के. मेनन यांनी केले. या कमिशन अंतर्गत कोरियन भुभागात स्थिर राजकीय स्थिती व सार्वत्रिक निवडणूकांच्या पाहणीसाठी स्थापना केली होती. भारतानेही कोरियन भुभागाच्या एकत्रीकरणाला पूर्ण पाठिंबा दिला होता. कोरियन भुभागाच्या एकत्रीकरणासाठी भारताने उत्तर कोरिया आणि दक्षिण कोरिया दरम्यान शांततेच्या मार्गाने एकीकरणाला महत्त्व दिले.[६]

भारत-कोरिया भुभागामध्ये कोरियाई युद्धामुळे पुन्हा संबंध स्थापित झाले. भारताने संयुक्त राष्ट्राच्या सुरक्षा परिषदेत ८२ व ८३ व्या प्रस्तावाला पाठिंबा दिला. यानुसार भारताने उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर आक्रमण केल्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे ८४ व्या प्रस्तवालाही भारताने पाठिंबा दिला त्यानुसार दक्षिण कोरियावर झालेल्या आक्रमणाचा सामना करण्यासाठी संयुक्त राष्ट्राच्या अंतर्गत सैन्य मदत पाठवली. मात्र भारताला नुकतेच स्वातंत्र्य मिळाल्याने देशाबाहेर सैन्य मदत पुरवणे शक्य नव्हते. त्यामुळे भारताने औषधी व मानवतेची सेवा म्हणून संयुक्त राष्ट्राअंतर्गत एक ६० वी इंडियन पॅराशुट फील्ड अँब्युलंस ऑफ इंडियन आर्मी मेडिकल कोर (IndianParashute Field Ambulance of Indian Army Medical Core) चा एक गट कोरियाला पाठवला.[७]

२. १९५३ मध्ये अरमिस्टिक कराराने उत्तर कोरिया व दक्षिण कोरियामध्ये शांतता वार्ता झाली. मात्र यामध्ये 'युद्धकैदीचा' महत्त्वाचा प्रश्न उद्भवला होता याच्या सोडवणूकीसाठी संयुक्त राष्ट्राने न्युट्रअल नेशनस् रिपॅटरीशन कमीशन (Neutral Nations Repatriation Commission NNRC) ची स्थापना करण्यात आली. याचे नेतृत्व ही भारतानेच केलेत्र या कमीशनचे अध्यक्ष म्हणून भारतातर्फे व्ही. के. मेनन यांना दिले. या कमीशन अंतर्गत युद्धकैदीची अदलाबदल करण्यासाठी भारताचे सैन्य जनरल थिमय्याची नियुक्ती करण्यात आली. जनरल थिमय्याच्या अंतर्गत इंडियन कसटेडियन फोर्स (Indian Custodial Force) (CFI) ची स्थापना करण्यात आली.

१९५३ च्या अरमेस्टिक कराराने युद्ध कैदींना आपल्या देशाबाहेर तटस्थ देशामध्ये स्थायिक होण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार ७६ कोरियन व १२ चीनी अशा एकूण ८८ युद्ध कैदींनी तटस्थ देशात स्थायिक होण्याची इच्छा व्यक्त केली.

भारत एनएनआरसी आणि सीएफआय चे अध्यक्ष असल्याने १९५४ मध्ये ८८ युद्ध कैदींना भारतात आणले. आणि संयुक्त राष्ट्रांमार्फत युद्ध कैदींना तटस्थ देशात स्थायिक होण्यासंदर्भात शिफारस केली.[९] त्यानुसार तटस्थ देशामध्ये भारत, मॅक्सिको, दक्षिण अमेरिकेतील इतर देशाचा समावेश युद्ध कैदींना स्थायिक होण्यासाठी करण्यात आला.

भारत तटस्थ देश असल्या कारणाने ३५ युद्धकैदींनी भारतात स्थायिक झाले. भारत सरकारनेही यांना इतर भारतीय नागरीकांप्रमाणे स्वातंत्र्य, अधिकार दिल्याने याला विरोध झाला. म्हणून पंतप्रधानांनी युद्धकैदीवर लष्करी नियंत्रण असल्याची घोषणा संसदेत केली. तसेच या युद्ध कैदीचा अपयोग देशातील वेगवेगळ्या प्रशिक्षणसाठी केला गेला.[१०]

भारताने कोरियन विवादामध्ये दोन कमीशनचे नेतृत्त्व केले. यामध्ये भारताने कोरियन प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयकरण होण्यापासून टाळले. ''कोरियाई विवाद हा गृहयुद्ध असून यात बाह्य देशांनी या गृहयुद्धापासून दूर राहावे असे आव्हान केले.'' कोरियन प्रश्नांत तटस्थ राष्ट्र म्हणून यश मिळवले.[११]

निष्कर्ष :

१९४७-१९५४ काळातील भारतीय तटस्थ व शांतता प्रिय भूमिकेने कोरिया युद्ध मर्यादित राहिले. तसेच तटस्थ आणि शांततापिय भूमिकांच्या यशाने भारताच्या पंचशिल धोरण आणि अलिप्ततावादी चळवळीतील शांतता व तटस्थतेच्या धोरणाला अधोरेखित केले. दोन जागतिक महासत्ता दरम्यान भारताच्या नेतृत्त्वाने ''तिसऱ्या जगाला'' एकत्रित येण्यास कोरियन विवादातील यशाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावली.या यशाने प्रोत्साहित होवून भारताने संयुक्त राष्ट्राअंतर्गत जागतिक शांतता टिकवण्यासाठी व्हिएतनाम, सुएझ समस्या, कांगो मध्ये यशस्वीरित्या सहभाग नोंदवला. भारतीय परराष्ट्रीय धोरण कोरियन विवादातील परिक्षणाने

तापून-सलाखुन अंमलात आणण्यासाठी महत्त्वपूर्ण होते.

संदर्भ :

१. दत्त, व्ही.पी., नरेंद्र तोमर, स्वतंत्र भारत की विदेशनिती, NBT, २००९, नवी दिल्ली, p.16.
२. Ibid, p. 18.
३. Chandra Prakash, Comparative Politics and International Relation, Pream Arora Cosmos Bookie Pvt. Ltd., 26th edition, 2010, Delhi, p. 187.
४. Stack William, The Korean War in World History, March 2010,
५. Wikipedia.
६. NNRC Report – 1956, Indian Foreign Ministry, p- 88-89.
७. Ibid.
८. Ibid.
९. झैन माथुर, आधुनिक विश्व इतिहास, जैन प्रकाशन मंदिर, २०१०, जयपूर, पृ. ७३२.
१०. NNRC Report – 1954.
११. NNRC Report – 1954